// महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १, अंक २३ ] मंगळवार, ऑगस्ट २५, २००९/भाद्र ३, शके १९३१ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्र. ४३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.**— महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. | पृष्ठे १-८ |


## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट २००९.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVII OF 2009.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

## सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी,
१९६६ चा महा. ३७. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २००९ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ यात प्रकरण तीन-क समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या प्रकरण तीन नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— १९६६ चा महा. ३७.

"प्रकरण तीन-क

**क्षेत्रविकास प्राधिकरण**

विकासक्षेत्र घोषित करणे.

**४२क.** (१) राज्य शासनास, राज्यातील क्षेत्रांचा नियोजित विकास साधण्याच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्यातील कोणतेही क्षेत्र विकासक्षेत्र म्हणून घोषित करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती ज्या क्षेत्राशी संबंधित असेल त्या क्षेत्राच्या सीमा निश्चित करील.

(३) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, दोन किंवा त्याहून अधिक विकासक्षेत्रांचे एका विकासक्षेत्रामध्ये एकत्रीकरण करता येईल, कोणत्याही विकासक्षेत्राचे निरनिराळ्या विकासक्षेत्रांमध्ये पोट-विभाग पाडता येतील आणि असे पोट-विभाग पाडण्यात आलेल्या क्षेत्राचा कोणत्याही अन्य विकासक्षेत्रामध्ये समावेश करता येईल.

अधिनियमाच्या प्रवर्तनातून संपूर्ण विकास-क्षेत्र किंवा त्याचा भाग वगळणे.

**४२ख.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कलम ४२क अन्वये घोषित केलेले संपूर्ण विकासक्षेत्र किंवा त्याचा भाग, या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींच्या प्रवर्तनातून वगळता येईल.

(२) कोणतेही विकासक्षेत्र किंवा त्याचा भाग यांच्याबाबतीत पोट-कलम (१) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यात आली असल्यास, या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदी व त्याखाली काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचना, नियम, विनियम व आदेश किंवा देण्यात आलेले निदेश व प्रदान करण्यात आलेले अधिकार हे, उक्त क्षेत्र किंवा यथास्थिति, त्याचा भाग यांना लागू होणे बंद होईल.

**४२ग.** (१) कलम ४२क अन्वये विकासक्षेत्र घोषित केल्यानंतर, लवकरात लवकर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा क्षेत्रासाठी, या अधिनियमा-अन्वये क्षेत्र विकास प्राधिकरणाने नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी एक प्राधिकरण घटित करील ज्याला त्या विकासक्षेत्राचे विकास प्राधिकरण असे म्हणण्यात येईल. क्षेत्र विकास प्राधिकरण घटित करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेले प्रत्येक क्षेत्र विकास प्राधिकरण हा, स्थावर व जंगम अशा दोन्ही मालमत्ता संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या व ती निकालात काढण्याच्या व करार करण्याच्या व उक्त नावाने दावा लावण्याच्या किंवा त्याविरुद्ध दावा दाखल करण्याच्या अधिकारांसह, अखंड उत्तराधिकार व एक सामायिक मुद्रा असलेला उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल.

(३) क्षेत्रविकास प्राधिकरणामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | |
|---|---|
| (क) संबंधित जिल्ह्याचा पालक मंत्री .. | अध्यक्ष ; |
| (ख) विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व पंचायत समित्यांचे सभापती, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यांमध्ये कार्यरत असलेल्या महानगर-पालिकांचे महापौर व नगरपरिषदांचे अध्यक्ष, | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यांमध्ये कार्यरत असलेल्या महानगर-पालिकांचे महानगरपालिका आयुक्त व नगर-परिषदांचे मुख्य अधिकारी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यांवर अधिकारिता असलेले जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी किंवा उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यांमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी, | पदसिद्ध सदस्य ; |

| | |
|---|---|
| (छ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा मुख्य अभियंता किंवा विकासक्षेत्रावर किंवा त्यातील कोणत्याही भागावर अधिकारिता असलेला अधीक्षक अभियंता दर्जाहून कमी नसेल अशा दर्जाचा त्याचा प्रतिनिधी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख किंवा विकास क्षेत्रावर किंवा त्यातील कोणत्याही भागावर अधिकारिता असलेली उप संचालक, भूमि अभिलेख दर्जाहून कमी नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती, | पदसिद्ध सदस्य ; |
| (झ) महानगर क्षेत्रासाठी सह संचालक, नगररचना दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा शासनाने नियुक्त केलेला अधिकारी आणि अन्य ठिकाणी राज्य शासन नियुक्त करील असा उप संचालक, नगररचना. | सदस्य-सचिव. |

(४) या अधिनियमातील कलमे ९, १० आणि ११ यांच्या तरतुदी, जशा प्रादेशिक नियोजन मंडळाला लागू होतात तशाच त्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या क्षेत्र विकास प्राधिकरणाला, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

शासकीय कंपनी, इत्यादीची क्षेत्र विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती करणे.

**४२घ.** राज्य शासन, विकासक्षेत्रासाठी क्षेत्र विकास प्राधिकरण घटित करण्याऐवजी, राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने स्थापन केलेले कोणतेही अभिकरण किंवा प्राधिकरण किंवा कोणतीही कंपनी किंवा महामंडळ यास, कोणत्याही विकासक्षेत्राकरिता क्षेत्र विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त करील.

महानगर नियोजन समिती आणि जिल्हा नियोजन समितीचे नियंत्रण.

**४२ङ.** (१) कलम ४२ग अन्वये घटित केलेले किंवा कलम ४२घ अन्वये नियुक्त केलेले, प्रत्येक क्षेत्र विकास प्राधिकरण, जिच्या अधिकारितेत त्या क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिसूचित क्षेत्र स्थित असेल अशी महानगर नियोजन समिती किंवा यथास्थिति, जिल्हा नियोजन समिती, वेळोवेळी देईल अशा निदेशांचे किंवा सूचनांचे पालन करील :

परंतु, क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिसूचित क्षेत्र, महानगर नियोजन समितीच्या तसेच जिल्हा नियोजन समितीच्या अधिकारितेत स्थित असेल तर, महानगर नियोजन समितीने दिलेले निदेश जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या निदेशांवर अभिभावी असतील.

(२) क्षेत्र विकास प्राधिकरण आणि महानगर नियोजन समिती किंवा यथास्थिती, जिल्हा नियोजन समिती यांच्यात कोणताही विवाद उद्‌भवल्यास तो राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(३) आपली कामे पार पाडताना, क्षेत्र विकास प्राधिकरण राज्य शासनाने दिलेल्या निदेशांस बांधील असेल.

क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिकार व कामे.

**४२च.** (१) क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिकार व कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये महानगर नियोजन समितीने किंवा यथास्थिति, जिल्हा नियोजन समितीने तयार केलेला विकास योजनेचा मसुदा लक्षात घेऊन नगररचना परियोजना तयार करणे आणि ती कार्यान्वित करणे ;

(दोन) नगररचना परियोजना तयार करण्यासाठी विकास क्षेत्राचे सर्वेक्षण करणे ;

(तीन) नियोजन प्राधिकरणाची कामे पार पाडण्यास परवानगी दिलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेतील क्षेत्र वगळून इतर विकास क्षेत्रामध्ये प्रकरण चार मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, विकास योजना आणि नगररचना परियोजनांनुसार विकासकामे करण्यावर नियंत्रण ठेवणे ;

(चार) क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे त्याबाबतीत तयार केलेल्या विनियमांनुसार विकास करण्याची परवानगी घेण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी छाननी शुल्क आकारणे व ते वसूल करणे ;

(पाच) क्षेत्र विकास प्राधिकरणास त्याची कामे पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा व्यक्तींबरोबर किंवा संघटनांबरोबर कंत्राट, करार किंवा व्यवस्था करणे ;

(सहा) क्षेत्र विकास प्राधिकरणास आवश्यक वाटेल अशी स्थावर अथवा जंगम मालमत्ता, तथापि, त्याबाबतीत कोणतेही नियम व विनियम करण्यात आले असल्यास त्यांच्या अधीनतेने, संपादित करणे, धारण करणे, तिची व्यवस्था बघणे आणि तिची विल्हेवाट लावणे ;

(सात) पाणीपुरवठा, मलप्रणाली याच्या संबंधातील कामे पार पाडणे व इतर सुखसोयींची तरतूद करणे ;

(आठ) खंड (सात) मध्ये नमूद केलेली कामे पार पाडण्यासाठी आणि अशा इतर सुखसोयींची तरतूद करण्यासाठी विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे शुल्क आकारणे व ते वसूल करणे ;

(नऊ) कोणत्याही पूर्वगामी अधिकारांना व कामांना पूरक, आनुषंगिक किंवा परिणामस्वरूप असतील अशा अथवा राज्य शासनाने निदेश दिलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि अशी अन्य कामे पार पाडणे.

(२) क्षेत्र विकास प्राधिकरण हे, नियोजन प्राधिकरणाच्या कामांची अंमलबजावणी करण्याची परवानगी देण्यात आलेल्या, या अधिनियमान्वये, स्थानिक प्राधिकरणाचे अधिकारिता क्षेत्र वगळून, त्यांच्या अधिकारितेखालील क्षेत्राकरिता एक नियोजन प्राधिकरण असेल.

(३) कोणत्याही विकास क्षेत्रासाठी क्षेत्र विकास प्राधिकरण घटित करताना किंवा यथास्थिति, नियुक्त करताना, पुढील परिणामांची खातरजमा करील :—

(एक) अशा प्रकारे घटित किंवा नियुक्त करण्याच्या लगतपूर्वी विकास क्षेत्रामध्ये कामे पार पाडत असलेले प्राधिकरण किंवा प्राधिकरणे, या अधिनियमान्वये, क्षेत्र विकास प्राधिकरण जे अधिकार वापरण्यास आणि जी कामे पार पाडण्यास सक्षम असतील असे अधिकार वापरण्याचे आणि अशी कामे व कर्तव्ये पार पाडण्याचे बंद करील ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रकरणे सहा-क, आठ व नऊच्या तसेच पहिल्या व दुसऱ्या अनुसूचीच्या तरतुदी, जणू काही ते नवीन नगर विकास प्राधिकरण होते असे मानून क्षेत्र विकास प्राधिकरणाला लागू होतील ;

(तीन) कलम २१ च्या तरतुदी क्षेत्र विकास प्राधिकरणाला लागू होणार नाहीत.

(४) क्षेत्र विकास प्राधिकरणास, राज्य शासनाच्या मान्यतेने, त्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये कामे पार पाडणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणांना त्यांचे कोणतेही अधिकार व कामे सोपविता येतील.

(५) क्षेत्र विकास प्राधिकरणाचे, राज्य शासन, आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी कार्यालय असेल.

क्षेत्र विकास प्राधिकरणांचा खर्च.

**४२छ.** (१) राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे, क्षेत्र विकास प्राधिकरणाला त्याने कामे पार पाडताना केलेल्या खर्चापोटी, विकास क्षेत्रामध्ये काम करीत असलेले प्राधिकरण किंवा प्राधिकरणे यांनी, आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, एकतर एकठोक रकमेच्या किंवा हप्त्याहप्त्याने द्यावयाच्या रकमेच्या स्वरूपात अंशदान म्हणून जी रक्कम प्रदान करावयाची असेल ती रक्कम निर्धारित करील.

(२) राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये ज्या प्राधिकरणाच्या बाबतीत आदेश काढला होता ते प्राधिकरण पोट-कलम (१) खालील आदेश मिळाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, संबंधित क्षेत्र विकास प्राधिकरणाला, आदेशात नमूद केलेल्या रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या अंशदानाची रक्कम प्रदान करील आणि असे प्राधिकरण अशी रक्कम अशा रीतीने प्रदान करण्यात कसूर करील तर, राज्य शासन, क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून आवश्यक ती माहिती मिळाल्यावर, राज्य शासन अशा रीतीने अशा प्राधिकरणाकडून ती रक्कम वसूल करील आणि ती रक्कम त्या क्षेत्र विकास प्राधिकरणाला देईल.''.

## निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) मध्ये कोणत्याही "अधिसूचित क्षेत्रा" करिता आणि प्रस्तावित नवीन नगराकरिता पदनिर्देशित क्षेत्रासाठी "नवीन नगर विकास प्राधिकरण" यांकरिता विशेष नियोजन प्राधिकरणे घटित करण्याची तरतूद आहे.

असे दिसून आले होते की, जलद नागरीकरणामुळे मोठ्या शहरांमधील नागरी परिसीमांत प्रदेश हे, अनिर्बंध व अनियंत्रित रीतीने विकसित होत आहेत, परिणामी तेथील वसाहत झपाट्याने वाढत आहेत. प्रादेशिक नियोजन मंडळे किंवा महानगर नियोजन समित्या यांनी तयार केलेल्या प्रादेशिक योजना किंवा मसुदा विकास योजना यांच्या अंमलबजावणीकरिता कोणतेही विशिष्ट प्राधिकरण नव्हते. तसेच, नागरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांच्या विकासविषयक कामांचे समन्वयन, एकात्मिकरण आणि विनियमन करणारे कोणतेही शिखर प्राधिकरणही नव्हते.

२. स्वतंत्र अधिनियमाअन्वये घटित केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्यतिरिक्त, प्रदेशांतर्गत विकासविषयक कामांचे समन्वयन, एकात्मिकरण आणि विनियमन करणारे कोणतेही शिखर प्राधिकरण राज्यातील कोणत्याही प्रदेशात नव्हते. पुणे महानगर प्रदेशाकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण घटित करण्याच्या मुद्यावर राज्य विधानमंडळामध्ये चर्चा करण्यात आली होती आणि शासनाला या संबंधात समर्थ करणारा कायदा करून राज्यातील कोणत्याही प्रदेशाकरिता अनेक विकास प्राधिकरणे घटित करता येणे शक्य व्हावे यासाठी विनंती करण्यात आली होती.

३. म्हणून, कोणतेही विकास क्षेत्र व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधिकार व कामे यांकरिता विकास क्षेत्र घोषित करणे यांसाठी क्षेत्र विकास प्राधिकरणांच्या संबंधातील एक स्वतंत्र "प्रकरण तीन-क" उक्त अधिनियमात समाविष्ट करून, या संबंधात तरतूद करणे इष्ट आहे असे शासनास वाटले.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १६ मे २००९ रोजी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २००९ (सन २००९ चा महा. अध्या. ७), हा प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर, दिनांक १ जून २००९ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, दिनांक २ जून २००९ रोजी उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक, सन २००९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ हे महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते आणि ते महाराष्ट्र विधानसभेने दिनांक १६ जून २००९ रोजी संमत केले होते. तथापि, उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेने संमत करण्यापूर्वीच महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अधिवेशनाची दिनांक १६ जून २००९ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक विधानपरिषदेकडे पारेषित होऊ शकले नाही. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, दिनांक १ जून २००९ रोजी राज्य

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच, दिनांक १२ जुलै २००९ नंतर उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले, म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये तातडीने सुधारणा करणे शासनाला इष्ट वाटते.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २४ ऑगस्ट २००९.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**टी. सी. बेंजामिन,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ३७] मंगळवार, ऑगस्ट २५, २००९/भाद्र ३, शके १९३१ [पृष्ठे ७, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ६४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. XVII of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. XVII of 2009), published under the authority of the Governor).

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 25th August 2009.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVII OF 2009.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, for the purposes hereinafter appearing ;

Mah. XXXVII of 1966.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance, 2009.

(*2*) It shall come into force at once.

Insertion of Chapter III-A in Mah. XXXVII of 1966.

**2.** After Chapter III of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the following Chapter shall be inserted, namely :— Mah. XXXVII of 1966.

## "CHAPTER III-A

## AREA DEVELOPMENT AUTHORITY

Declaration of development area.

**42A.** (*1*) The State Government may, for the purpose of securing planned development of areas within the State, declare by notification in the *Official Gazette*, any area in the State to be a development area.

(*2*) Every notification issued under sub-section (*1*) shall define the limits of the area to which it relates.

(*3*) The State Government may, by notification in the *Official Gazette*, amalgamate two or more development areas into one development area, sub-divide any development area into different development areas and include such sub-divided areas in any other development area.

Exclusion of whole or part of development area from operation of Act.

**42B.** (*1*) The State Government may, by notification in the *Official Gazette*, withdraw from operation of the relevant provisions of this Act, the whole or part of any development area declared under section 42A.

(*2*) Where any notification is issued under sub-section (*1*) in respect of any development area or part thereof, the relevant provisions of this Act and all notifications, rules, regulations and orders made or directions issued and powers conferred thereunder, shall cease to apply to the said area or, as the case may be, part thereof.

Constitution of Area Development Authority.

**42C.** (*1*) As soon as may be after the declaration of a development area under section 42A, the State Government shall, by notification in the *Official Gazette*, constitute an authority for such area to be called the Area Development Authority of that development area for the purpose of carrying out the functions assigned to an Area Development Authority under this Act.

(*2*) Every Area Development Authority constituted under sub-section (*1*) shall be a body corporate by the name aforesaid, having perpetual succession and a common seal, with power to acquire, hold and dispose of property, both movable and immovable, and to contract and by the said name sue and be sued.

(3) An Area Development Authority shall consist of the following members, namely :—

| | | |
|---|---|---|
| (a) | Guardian Minister of the concerned district, .. | Chairman; |
| (b) | the Presidents of *Zilla Parishads* and Chairmen of *Panchayat Samitis* functioning in the development area or in any part thereof, | *Ex officio* Members; |
| (c) | Mayors of Municipal Corporations and Presidents of Municipal Councils, functioning in the development area or in any part thereof, | *Ex officio* Members; |
| (d) | Municipal Commissioners of Municipal Corporations and Chief Officers of Municipal Councils, functioning in the development area or in any part thereof, | *Ex officio* Members; |
| (e) | The Collectors of Districts or their representatives not below the rank of Deputy Collector having jurisdiction over the development area or any part thereof, | *Ex officio* Members; |
| (f) | Chief Executive Officers of *Zilla Parishads* or their representatives not below the rank of Deputy Chief Executive Officer, functioning in the development area or any part thereof, | *Ex officio* Members; |
| (g) | The Chief Engineer of the Maharashtra *Jeevan* Authority or his representative not below the rank of Superintending Engineer having jurisdiction over the development area or any part thereof, | *Ex officio* Member; |
| (h) | Settlement Commissioner and Director of Land Records or his nominee not below the rank of Deputy Director of Land Records having jurisdiction over the development area or any part thereof, | *Ex officio* Member; |
| (i) | Chief Executive Officer not below the rank of Joint Director of Town Planning or an officer appointed by Government for Metropolitan area and Deputy Director of Town Planning elsewhere, to be appointed by the State Government. | Member-Secretary. |

(4) The provisions of sections 9, 10 and 11 of this Act shall *mutatis mutandis* apply to an Area Development Authority constituted under sub-section (1) as they apply in relation to a Regional Planning Board.

Appointment of Government company, etc., as Area Development Authority.

**42D.** The State Government may, instead of constituting an Area Development Authority for a development area, appoint any agency or authority or any company or corporation established by the State or Central Government to be the Area Development Authority for any development area.

Control by Metropolitan Planning Committee and District Planning Committee.

**42E.** (*1*) Every Area Development Authority constituted under section 42C or appointed under section 42D shall carry out such directions or instructions as may be issued, from time to time, by the Metropolitan Planning Committee or the District Planning Committee, as the case may be, within whose jurisdiction the notified area of the Area Development Authority, is situated :

Provided that, if the notified area of an Area Development Authority is situated in the jurisdiction of a Metropolitan Planning Committee and also of a District Planning Committee, the directions issued by the Metropolitan Planning Committee shall prevail over the directions issued by the District Planning Committee.

(*2*) Any dispute between the Area Development Authority and the Metropolitan Planning Committee or, the District Planning Committee, as the case may be, shall be referred to the State Government whose decision thereon shall be final.

(*3*) In the discharge of its duties, the Area Development Authority shall be bound by the directions issued by the State Government.

Powers and functions of Area Development Authority.

**42F.** (*1*) The powers and functions of an Area Development Authority shall be,—

(*i*) to undertake the preparation and execution of town planning schemes having regard to the draft development plan prepared by the Metropolitan Planning Committee or the District Planning Committee, as the case may be, under the provisions of this Act ;

(*ii*) to carry out surveys in the development area for the preparation of town planning schemes ;

(*iii*) to control the development activities in accordance with the development plan and town planning schemes in the development area excluding the area under the jurisdiction of a local authority, which is permitted to execute the functions of a Planning Authority, in the manner provided for in Chapter IV ;

(*iv*) to levy and collect such scrutiny fees for scrutiny of proposals submitted to the Area Development Authority for permission for development in accordance with the regulations, made in that behalf ;

(*v*) to enter into contracts, agreements or arrangements, with any person or organization as the Area Development Authority may deem necessary for performing its functions ;

(*vi*) to acquire, hold, manage and dispose of property, movable or immovable, as the Area Development Authority may deem necessary, subject, however, to the rules or regulations, if any, made in that behalf ;

(*vii*) to execute works in connection with supply of water, disposal of sewerage and provision of other services and amenities ;

(*viii*) to levy and collect such fees, for the execution of work referred to in clause (*vii*) and for provision of other services and amenities, as may be specified by the regulations ;

(*ix*) to exercise such other powers and perform such other functions as are supplemental, incidental or consequential to any of the foregoing powers and functions or as may be directed by the State Government.

(*2*) The Area Development Authority shall be a Planning Authority for the area under its jurisdiction excluding the area under the jurisdiction of a local authority under this Act which is permitted to execute the functions of a Planning Authority.

(*3*) On the constitution or, as the case may be, appointment of an Area Development Authority for any development area, the following consequences shall ensue, namely :—

(*i*) the authority or authorities functioning within the development area immediately before such constitution or appointment shall cease to exercise the powers and perform the functions and duties which the Area Development Authority is competent to exercise and perform under this Act ;

(*ii*) the provisions of Chapters VI-A, VIII and IX alongwith the First and Second Schedule of this Act shall apply to the Area Development Authority, as if it was a New Town Development Authority ;

(*iii*) the provisions of section 21 shall not apply to the Area Development Authority.

(*4*) The Area Development Authority may, with the approval of the State Government, delegate any of its powers and functions to any authority or authorities functioning within its jurisdiction.

(*5*) The Area Development Authority shall have its office at such place as the State Government may, by order, specify.

Expenses of Area Development Authority.

**42G.** (*1*) The State Government shall, by an order in writing, determine the amount which an authority or authorities functioning in the development area shall pay as contribution, either in one *lump sum* or in installments as may be specified in the order, towards the expenses incurred by an Area Development Authority in the discharge of its functions.

(*2*) The authority, in respect of whom the order under sub-section (*1*) has been issued by the State Government, shall, not later than six months from the receipt of the order under sub-section (*1*), pay to the Area Development Authority concerned, the amount of contribution specified in the order in the manner indicated therein and if such authority fails to so pay such amount, the State Government shall, on receipt of necessary intimation from the Area Development Authority, recover the same from such authority, in the manner as the State Government may decide and pay it to such Area Development Authority.".

STATEMENT

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) provides for constitution of Special Planning Authorities for any "Notified Area" and "New Town Development Authority" for the site designated for the proposed New Town.

It had been observed that due to rapid urbanization, the peri-Urban area of the large cities are being developed in a haphazard and uncontrolled manner leading to mushroom growth of settlements. There was no specific authority for implementation of Regional Plans or draft Development Plans prepared by Regional Planning Boards or Metropolitan Planning Committees. There was also no Apex Authority who can co-ordinate, integrate and regulate the developmental activities of urban and rural local bodies.

2. Except Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) which is constituted under a separate Act, there was no apex authority for any region in the State for co-ordinating, integrating and regulating the developmental activities within the region. The issue of constitution of Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) for Pune Metropolitan Region was discussed in the State Legislature and the Government was urged to make an enabling law in this regard so that many development authorities can be constituted for any region in the State.

3. The Government, therefore, considered it expedient to make provisions in this regard by incorporating a separate Chapter III-A in the said Act regarding Area Development Authority by providing for declaration of the development area, constitution of the Area Development Authority for any development area and powers and functions of the Area Development Authority.

4. As both Houses of the State Legislature were not in session and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for the purposes aforesaid, the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. VII of 2009), was promulgated by the Governor of Maharashtra on the 16th May 2009.

5. Thereafter, upon the re-assembly of the State Legislature on the 1st June 2009, a Bill to convert the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Assemby as L. A. Bill No. VI of 2009, on the 2nd June 2009 and was passed by the Maharashtra Legislative Assembly on the 16th June 2009. However, the said Bill could not be transmitted to the Maharashtra Legislative Council, as the session of the Maharashtra Legislative Council was already prorogued on the 16th June 2009 before the said Bill was passed by the Maharashtra Legislative Assembly. As both Houses of the Maharashtra State Legislature had re-assembled on the 1st June 2009,

as provided by article 213 (2) (*a*) of the Constitution of India, the said Ordinance ceased to operate at the expiration of six weeks from the date of re-assembly of the State Legislature, that is after the 12th July 2009. The Government, therefore, considers it expedient to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, urgently.

6. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 24th August 2009.

S. C. JAMIR,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

T. C. BENJAMIN,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.